**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** **दि. ०५/०७/२०२६**

**<u>सराईत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीचा जामीन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी नामंजुर केल्याबाबत.</u>**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | ३३/२५ कलम ८(क) सह २२(ब),२२(क),२९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ |
| **दाखल दिनांक** | दिनांक १३/०४/२०२५ रोजी ०५.४५ वा. |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | बी.एम.सी. चे सरवर सामाजिक शौचालयाचे समोरील रोडचे फुटपाथवर, इलेक्ट्रिक पोल क्र. एसव्हीपी १३, एस. व्ही. पी. रोड, वाडीबंदर, मुंबई ०९ |
| **आरोपी संख्या** | **एकूण ०३ आरोपी** |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | ९७ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ अं.किं. १९,४०,०००/- |

सदर गुन्हयात अटक आरोपी क्रं ०१ इब्राहिम कासम चौहान यास गस्तीदरम्यान अंमली पदार्थ विरोधी कक्ष घाटकोपर पथकाने ७५ ग्रॅम एम.डी.(मॅफेड्रॉन) या अंमली पदार्थासह अटक केली होती, सदर जप्त ७५ ग्रॅम एम.डी.(मॅफेड्रॉन) हे अटक आरोपी क्रं ०२ आसिफ कासम राजकोटवाला याने पुरविल्याचे तपासात दिसून आले. आरोपी आसिफ कासम राजकोटवाला हा गुन्हा घडलेपासून पळून गेला होता. त्याचा शोध घेउुन अंमली पदार्थ विरोधी कक्ष घाटकोपर युनिट पथकाने सुरत गुन्हे शाखेच्या मदतीने त्यास सुरत येथे पकडले. सुरत येथून आसिफ राजकोटवाला यास मुंबई येथे आणण्यात येउुन त्याचे राहते घरातून २२ ग्रॅम एम.डी..(मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ जप्त करण्यात आला होता.

अटक आरोपी क्र. ०२ आसिफ कासम राजकोटवाला याने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे जामिन अर्ज क्र. ४८८९/२०२५ अन्वये जामीन अर्ज सादर केला होता. आरोपी आसिफ कासम राजकोटवाला रा.ठि. ७०/७२ सादिक अली मेन्शन ८ वा माळा, रुम नं. ३५, इसाजी स्ट्रीट मस्जिद बंदर, मुंबई ०३ याचे वर यापूर्वी १) एन.सी.बी. गुरनं- ११/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ कलम ८ (क),२२(क),२९ २) अं.प.वि. बांद्रा २१/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ कलम ८ (क), २२(क),२९ अन्वये गुन्हे नोंद आहे. नमुद अटक आरोपी याने यापूर्वी केलेला जामीन अर्ज मा. सत्र न्यायालय, मुंबई यांनी नामंजुर केला होता. वारंवार जामिनावर सुटून त्याच स्वरुपाचे गुन्हे करुन, मा. न्यायालयाच्या जामिन विषयक अटी व शर्तीचे उल्लंघन आरोपी करित असल्याचे निरिक्षण जामिन अर्ज नामंजूर करतांना मा. उच्च न्यायालयाने नोंदविले आहे. आरोपीचा जामीन अर्ज मा. उच्च न्यायालयाने नामंजूर केला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा. पोर्णिमा चौगुले- श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या मागदर्शनाखाली तपास पथक अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत घाटकोपर युनिटचे व.पो.नि. श्री. श्रीकांत आदाटे यांचे नेतृत्वात पोनि. दिगंबर पाटील यांनी केली आहे. तसेच सरकारी पक्षातर्फे श्री. मयुर सोनवणे, सहायक सरकारी अभियोक्ता उच्च न्यायालय, मुंबई यांनी कामकाज पाहिले.

Scanned with CamScanner